# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा

**सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी गट-ब यांची तदर्थ पध्दतीने नेमणुका करण्याकरीता जाहिरात.**

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा अंतर्गत आयुर्वेदिक दवाखाना येथे बि.ए.एम.एस. वैद्यकिय अधिकारी गट-ब एकुण 34 रिक्त जगांकरीता उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे.**

1. वरील समितीने निवड केलेल्या तदर्थ वैद्यकिय अधिकाऱ्यांना पुढील प्रमाणे मानधन अदा करण्यात येईल. बि.ए.एम.एस. पात्रता धारकांना 40000/- ईतके एकत्रित मानधन अदा करण्यात येईल.
2. उमेदवाराने विहित नमुण्यामध्ये त्यांच्या संपुर्ण कागदपत्रासह अर्ज दिनांक27/08/2024 पर्यंत जिल्हा आरोग्य अधिकारी यांच नावाने त्यांच्या कार्यालयामध्ये जमा करण्यात यावा. अर्जासोबत राष्ट्रयकृत बॅकेचा रुपये 300/-चा धनाकर्ष जोडण्यात यावा. धनाकर्ष नसल्यास अर्ज अपात्र करण्यात येईल. धनाकर्षाच्या मागे स्वत:चे नाव लिहावे. सदरचा धनाकर्ष DIST HEALTH OFFICER Z P BULDANA यांचे नावाने काढावा.
3. सदर तात्पुरती नियुक्ती केवळ 11 महिन्यांसाठी किंवा सदर पदावर नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत अंमलात राहील. त्यानंतर सदर नियुक्त्या आपोआप संपुष्टात येईल.
4. सदर केवळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणुका असल्यामुळे तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांना वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय असनार नाही.
5. तदर्थ , वैद्यकिय अधिकारी हे नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही फायदे मिळण्यास पात्र असणार नाहीत.
6. सदर तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकारी यांचे सारखे वेतन नियमानुसार वेतन मिळणार नाही, म.ना.से. (रजा), नियम लागू राहणार नाही तसेच विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.
7. सदर तदर्थ नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही व त्या पदाचा धरणाधिकार असणार नाही.
8. केवळ तात्पुरती व तदर्थ नियुक्ती दिलेल्या उमेदवारंची टी सेवा म.ना.से. (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 30 नुसार अहर्ताकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही किंवा सेवाजेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.
9. सदर तदर्थ वैद्यकिय अधिकाऱ्यांना म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 मधील तरतुदी लागू होतील.
10. तदर्थ वैद्यकिय अधिकाऱ्यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची तदर्थ सेवा पूर्व सुचना न देता समाप्त करण्यात येईल.
    a. दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवागी गैरहजर
    b. कामामध्ये निष्काळजीपणा.
    c. बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.
    d. कामकाज अकार्यक्षम असणे/सेवेची कर्तव्ये व जाबाबदाऱ्या कटाक्षाने न बजावल्यास.
    e. गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शस येणे.
    f. कार्यरत पदावर नियमित वैद्यकिय अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यास.
11. सदर तदर्थ वैद्यकिय अधिकाऱ्यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्यांचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.
12. निवड झालेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यानी मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल. तसेच बायोमेट्रिक हजेरीप्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.

13. निवड झालेले वैद्यकिय अधिकारी 1 महिन्यांची अगाऊ सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी यांना देऊन कार्यमुक्त होवु शकतील अन्यथा 1 महिण्याचे वेतन शासनास जमा करावे लागेल.

14. खालील कारणास्तव कार्यमुक्त झालेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.
    - a. तदर्थ म्हणुन नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापुर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडुन गेलेले वैद्यकिय अधिकारी.
    - b. शासन सेवेत 58 वर्ष पूर्ण करुन सेवानिवृत्त झालेले वैद्यकिय अधिकारी.
    - c. शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकिय अधिकारी.
    - d. अनधिकृत गैरजर असलेले व शासन सेवेतुन काढून टाकेलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकिय अधिकारी.

15. सदर नियुक्ती तदर्थ स्वरुपाची असल्यामुळे तदर्थ वैद्यकिय अधिकारी म्हणुन नियुक्ती झाल्यानंतर सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यांसाठी आंदोलन/संप/बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र 100 रुपयांच्या स्टँप पेपरवर नोटरी करुन देण्यात यावे.

16. या सेवा तदर्थ पध्दतीच्या असल्याने त्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

17. शासन सेवा शर्ती खली ही सेवा नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र नाहणार नाही.

18. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

19. वयोमर्यादा :
    - a. उमेदवाराने अर्ज सादर करण्याच अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहित वयोमर्यादा असणे आवश्यक आहे आणि आवश्यक किमान शैक्षणीक अर्हता धारण करणे आवश्यक राहिल.
    - b. अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास खुल्या व सामाजीक आरक्षण प्रावर्गातील उमेदवारांचे वय 18 पेक्षा कमी नसावे व 58 पेक्षा जास्त नसावे.

20. कामाचा अनुभव हा शासकीय/निमशासकिय/स्थानिक स्वराज्य संस्थांचाच ग्राह्य धरण्यात येईल.

21. सर्व प्राप्त अर्जाची शैक्षणीक अर्हता आणि आवश्यक अनुभव या आधारे छाननी करण्यात येईल. छाननी अंती सर्व निकष पुर्ण करणाऱ्या उमेदवारास खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार गुणांक देण्यात येईल.

| विवरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदाच्या आवश्यक Qualifying Exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या अधारे | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे 50 प्रमाणे Proportion काढावे (उदा. 60% गुण प्राप्त असल्यास 50 प्रमाणे Proportion = 60x50/100=30) | अधिकतम 50 गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधीत | अधिकतम 20 गुण देण्यात येतील. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे 20 प्रमाणे Proportion काढावे (उदा बि.ए.एम.एस. पुर्ण झाल्यानंतर पदवित्तर पदवी/पदविका असल्यास | 20 गुण |

| | | |
|---|---|---|
| विषयाची शैक्षणिक अर्हता विचारात घेण्यात येईल | उमेदवाराचे पदवित्तर पदवी/पदविकाच्या अंतिम वर्षात 60 टक्के कुण प्राप्त असल्यास त्याचे 20 टक्के प्रमाणे Proportion = 60x20=12 गुण. | |
| संबंधीत पदाशी निगडीत अनुभव | प्रत्यक एका वर्षासाठी 6 गुण देण्यात येतील. फक्त शासकिय संस्था, विभाग शासन अंगीकृत संस्था, NHM यांचाच अनुभव ग्राह्य धरण्यात येईल (प्रत्येक 1 वर्षाकरिता 6 गुण, जास्तीत जास्त 30 गुण | 30 गुण |
| एकुण | | 100 गुण |

22. निवड प्रक्रियेत पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी जिल्हा जिल्हा परिषदेच्या https://zpbuldhana.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जानार नाही.
23. निवड यादीतील गुणानुक्रमानुसाराच प्राधान्याक्रमाने पदस्थापना केली जाईल. त्या बाबत उमेदवाराने कुठल्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवराची निवड रद्द करण्यात येईल.
24. उमेदवाराने विहित नमुण्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह आपले अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, बुलडाणा येथे दिनांक 20/8/2024 ते दिनांक 27/08/2024 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत स्वत: सादर करावेत. इतर कोणत्याही पध्दतीने (पोष्टाने, ऑनलाईन, ईमेल) आलेले अर्ज स्विकारल्या जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी. अर्ज सादर केल्यानंतर अर्ज स्विकृती पोच पावती कार्यालयाकडुन घेणे आवश्यक राहील. ठरवुन दिलेल्या दिनांकानंतर प्राप्त अर्ज कुठल्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही.
25. एम.सि.आय.एम. चे रजिष्ट्रेशन आवश्यक आहे. प्रोव्हीजनल रजिष्ट्रेशन ग्राह्य धरली जानार नाही. परमंट रजिष्ट्रेशन ग्राह्य धरण्यात येईल.
26. सदर जाहिरात स्थगीत करणे, रद्द करणे, पदसंखेत बदल करणे, प्रक्रियेत बदल करणे, इत्यादी तसेच सदर पदभरतीबाबतचे सर्व अधिकार समितीने राखुन ठेवलेले आहे.

सदस्य सचिव, निवड समिती
तथा, जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलडाणा

अध्यक्ष, निवड समिती
तथा, जिल्हाधिकारी, बुलडाणा

# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा

**सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी गट-ब यांची तदर्थ पध्दतीने अर्जाचा नमुना.**

फोटो

प्रती,

मा. जिल्हाधिकारी, बुलडाणा
तथा अध्यक्ष निवड समिती.

महोदय,

मला बुलडाणा जिल्ह्या अंतर्गत तदर्थ वैद्यकिय अधिकारी पदावर कंत्राटी पध्दतीने 11 महिणे कालावधी करीता आपल्या जिल्ह्यात नियुक्ती देण्यात यावी हि विनंती. माझी वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1 | अर्जदाराचे पुर्ण नाव | |
| 2 | अर्जदाराचा सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| 3 | अर्जदाराचा मुळचा/कायमचा पत्ता | |
| 4 | फान नंबर/ मो. नंबर | |
| 5 | ई-मेल. | |
| 6 | शैक्षणिक अर्हता | |
| 7 | महाविद्यालयाचे नाव | |
| 8 | बि.ए.एम.एस. उत्तीर्ण केल्याचे वर्ष | |
| 9 | पदव्युत्तर पदवी/पदविका | |
| 10 | रजिस्ट्रेशन क्रमांक | |
| 11 | अंतिम वर्षाचे गुण (बि.ए.एम.एस.) व टक्केवारी | एकुण गुण –<br>मिळालेले गुण<br>टक्केवारी |
| 12 | या पुर्वी सेवा केलेली असल्यास तपशील व सोडण्याचे कारण | |

| | | |
|---|---|---|
| 13 | शासकिय/निमशासकिय/NHM मधील अनुभव असल्यास (सोबत अनुभव प्रमाणपत्र जोडण्यात यावे.) | एकुण अनुभव<br>(वर्ष           महिणे           दिवस           ) |

प्रमाणीत करण्यात येते की, वर नमुद केलेली माहिती हि खरी आहे. सदरहु माहिती खोटी आढळल्यास नियमानुसार कार्यवाहीस मी स्वत: जबाबदार राहिल.

अर्जदाराची सही.

(.................................................)

दिनांक :      /        2024

सहपत्रे

1) बि.ए.एम.एस. च्या सर्व वर्षाच्या गुणपत्रीका.
2) पदव्युत्तर पदवी/पदविका असल्यास गुणपत्रीका
3) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र
4) जन्म तारखेचा दाखला
5) डिग्री प्रमाणपत्र
6) पासिंग प्रमाणपत्र
7) प्रयत्न प्रमाणपत्र.
8) अनुभव प्रमाणपत्र